म. वि. प्र.समाजाचे,

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर, नाशिक.

---

## रासेयो विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर अहवाल- 2021-22

गुरुवार दि १६ डिसेंबर 2029 रोजी श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ झाला. या दिवशी साहित्य आणि स्वयंसेवक डुबेरे ता. सिन्नर या गावी दाखल झाले. स्वयंसेवकांनी जनता विद्यालय डुबेरे येथे स्वच्छता अभियान सबविले. दुपारी ३;०० वा प्रा. आर.टी. सोनवणे यांचे सिन्नर तालुक्याचे भौगोलिक स्थान या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

शुक्रवार दि. १७ डिसेंबर २०२१ रोजी स्वयंसेवकांनी पाहते व्यायाम व योगासने केले. तसेच हुबेरे येथील जनता विद्यालयाच्या आवारात व गेटच्या बाहेरच्या बाजूला स्वच्छता केली. या दिवशी शिबिराचे उद्घाटन मविप्र समाज संस्थेचे सभापती मा. श्री. माणिकराव माधवसव बोरस्ते यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनानंतर लगेचच डुबेरे येथीलभैरवनाथ मंदिर परिसरात स्वयंसेवकांनी स्वच्छता व झाडांना आळे तयार केले. या दिवशी प्रा.श्री. रामदास वारुंगसे यांचे गड किल्ले संवर्धन या विषयावर मार्गदर्शपर व्याख्यान संपन्न झाले.



### श्रमसंस्कार शिबिरातून व्यक्तिमत्त्वाचा विकास

**बोरस्ते : सिन्नर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा डुबेरे येथे कार्यक्रम**

डुबेरे येथे श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलतांना मविप्रचे सभापती माणिकराव बोरस्ते. समवेत सुनील ढिकले, हेमंत वाजे, डॉ. पी. व्ही. रसाळ, नारायण वाजे आदी.

सुनील ढिकले अध्यक्षस्थानी होते.

सदर शिबिर डुबेरे या दत्तक गावात सुरू झाले असून, राष्ट्र व समाज विकासाच्या अनेक संकल्पना घेऊन श्रमसंस्कारांचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी शिबिराचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. त्यांनी डुबेरे गावांमध्ये सहकाराची मोठी परंपरा असून, या सहकाराच्या माध्यमातून गावाने ग्रामविकास कसा प्रकारे साधलेला आहे, याचाही विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे सांगितले. यावेळी मविप्र संस्थेचे संचालक हेमंत वाजे यांनीही मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शालेय समितीचे अध्यक्ष नारायण वाजे यांनी मार्गदर्शन केले. सरपंच अर्जुन वाजे यांनीही शिबिरार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश भास्कर यांनी सूत्रसंचालन केले, तर एस. बी. कर्डक यांनी आभार मानले. यावेळी अंबादास वाजे, विठ्ठल वाजे, भाऊपाटील वारुंगसे, रवींद्र वारुंगसे, उपसरपंच नंदाताई पवार, वसंतराव जाधव, शरद माळी उपप्राचार्य डॉ. डी. एम. जाधव, प्रा. आर. व्ही. पवार, सी. जी. बर्वे उपस्थित होते.



शनिवार दि. १८ डिसेंबर २०२१ रोजी स्वयंसेवकांनी दशक्रिया -विधी शेड परिसरात स्वच्छतेची कामे केली. तसेच या ठिकाणी असलेल्या नाल्यात असलेल्या बांधावर दगडी पिसिंग करण्याचे काम स्वयंसेवकांनी केले. या वेळी एकूण चार वांधांवर दगडी पिसिंग करण्यात आली. या दिवशी प्रा. सी. जे. बर्वे यांचे डुबेरे गावचा इतिहास या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

G.M.D. ARTS, B.W. COMMERCE & SCIENCE COLLEGE
SINNAR
422 103











रविवार दि. १९ डिसेंबर २०२१ रोजी स्वयंसेवकांनी सकाळी व्यायाम योगासने आटोपून आपल्या दैनंदिन कामकाजास सुरुवात केली. या दिवशी डुबेरे गावातील डुबेरे गड या ठिकाणी पर्यावरणीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते.स्वयंसेवकांनी गडावर असलेल्या सप्तशृंगी देवी मंदिर परिसरात स्वच्छता केली. या ठिकाणी असलेले विटांचे तुकडे,दगड आणि नारकाच्या शेंड्या यावेळी स्वयंसेव -कांनी गोळा केल्या व मंदिर परिसर झाडून स्वच्छ केला. या दिवशी प्रा. वाय एल भारस्कर यांचे आर्थिक साक्षरता या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.







G.M.D. ARTS, B.W. COMMERCE & SCIENCE COLLEGE
SINNAR
422 103

या दिवशी दुपारी १;00 वा संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी १०२ स्वयंसेवक व शिक्षकांची शुगर आणि हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. सिन्नर नगरपरिषदेचे वैद्यकिय अधिकारी डॉ. सिंग यांचे हिवाळयातील आजार व उपाय योजना या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.






मंगळवार दि. २१ डिसेंबर २०२१ रोजी स्वयंसेवकांनी डुबेरे येथील स्मशानभूमी / शांतीवन येथे साफसफाई केली. तसेच शांतीवनात असलेल्या झाडांच्या बुंध्याभोवती यावेळी आळे तयार करण्यात आले. या परिसरात असलेल्या पर्जन्यमापक यंत्राची माहिती यावेळी प्रा. रामदास वारूंगसे यांनी स्वयंसेवकांना दिली. या दिवशी डुबेरे येथील थोरले बाजीराव पेशवे यांचे जन्मस्थान बर्वे वाडा या एतिहासिक ठीकानाबद्दल माहिती प्रा. सी.जे बर्वे गांवी स्वयंसेवकाना दिली या दिवशी अॅड आण्णासाहेब सोनवणे यांचे कायदे विषयक जनजागृती या विषयावर स्वयंसेवकांना व्याख्यान संपन्न झाले.





बुधवार दि. २२ डिसेंबर २०२१ रोजी स्वयंसेवकांनी डुबेरे येथील जनता विद्यालक व उच्च माध्यमिक विद्यालय 'परिसरात स्वच्छता मोहिम राबवीली यादिवशी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप म.वि.प्र. संचालक मा.श्री. हेमंतनाना वाजे यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या दिवशी प्रा. एस.बी.कर्डक यांचे सहकारातून समृद्धी या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. व्याख्यानानंतर स्वयंसेवक सर्व साहित्य घेऊन महाविद्यालवान दाखल झाले.



श्रमसंस्कार शिबिर समारोप • सिन्नर महाविद्यालयात संचालक वाजे यांचे प्रतिपादन

# श्रमसंस्कार शिबिरामधून मिळणारे अनुभव व संस्कार आयुष्यभर पुरणारे

प्रतिनिधी : सिन्नर

विद्यार्थी दशेतच शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामधून आपण जे काही शिकतो ते अनुभव आणि संस्कार आयुष्यभर पुरणारे शिदोरी आहे, असे प्रतिपादन मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक हेमंत वाजे यांनी केले.

सिन्नर महाविद्यालयाच्या हिवाळी श्रम संस्कार शिबिर समारोप कार्यक्रमात बोलताना हेमंत वाजे. व्यासपीठावर राजेंद्र नवले, नारायण वाजे, अर्जुन वाजे, प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, के. एस. जाधव, नंदा पवार, रामनाथ पावसे आदी.

शिबिरांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. नारायण वाजे यांनी पुढील आयुष्यातील वाटचालीत शिबिरातील संस्कार उपयोगी पडतील, असे सांगितले. प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांनी नेतृत्वगुण, स्वावलंबन, व्यक्तिमत्त्व विकसित होत असल्याचे सांगितले.

कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. बी. कर्डक यांनी शिबिरात केलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी गावातील दुर्गंध सफाई, कोविड लसीकरण, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक स्थळांचे सर्वेक्षण विद्यार्थ्यांनी केल्याचे सांगितले.



तसेच शिबिर् कालावधीत स्वयंसेवकांनी कोविड लसिकरण सर्व्हे, प्राणी सर्व्हे, वनस्पती सर्व्हे, आणि ऐतीहासिक स्थळांची माहिती असे महत्वपूर्ण उपक्रम सबविण्यात आले. रसदर शिबीरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उबेरे गावचे सरपंच मा. अर्जुन रामकृष्ण वाजे, यांचे मार्गदर्शन लाभले. तर कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनील कर्डक, प्रा. योगेश भारस्कर, प्रा.श्रीम जे. जे. भांगरे, प्रा. श्रीम. अर्चना पगार आदिनी परिश्रम घेतले.

Programme Officer
National Service Scheme
G.M.D. Arts, B.W. Commerce & Science
College, Sinnar, Dist. Nashik

प्राचार्य
जी.एम.डी.आर्टस्, बी.डब्ल्यु. कॉमर्स अॅन्ड
सायन्स कॉलेज, सिन्नर, जि. नाशिक